# संपादकीय

गतवर्षीच्या मे महिन्याचा ‘परामर्श’ चा अंक हा ‘मार्क्स आणि भारतीय विचारवंत’ या विशेषांकाचा पहिला भाग होता. त्यात बुद्ध, धर्मानंद कोसांबी, गांधीजी, विष्णुबावा ब्रह्मचारी, आंबेडकर या भारतीय विचारवंतां-बरोबर मार्क्सची वैचारिक तुलना करणारे– त्यांचा मार्क्सबरोबर वैचारिक सामंजस्य आणि संघर्ष कुठे व कसा होऊ शकतो, त्याचा विचार करणारे लेख आम्ही प्रसिद्ध केले होते. त्यात काही महत्त्वाचे विचारवंत राहून गेले होते, तर काही विचारवंतांबरोबर मार्क्सची वैचारिक तुलना अधिक खोलात व तपशीलांत जाऊन होण्याची गरज होती. ती त्रुटी निदान अंशत: तरी भरून काढणारे लेख या विशेषांकाच्या दुसऱ्या भागात समाविष्ट करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. हा दुसरा भाग ‘परामर्शच्या’ वाचकांना सादर करताना आम्हाला आनंद होत आहे.

या अंकात मानवेंद्रनाथ रॉय यांच्या बदलत गेलेल्या मार्क्सवादविषयक भूमिकेचा चिकित्सक परिचय अशोक चौसाळकरांनी करून दिला आहे. त्यांचाच दुसरा लेख इतिहासाचार्य राजवाड्यांच्या सामाजिक, राजकीय व इतिहासविषयक विचारांचा आढावा घेऊन त्यांच्या विचारातील मार्क्सवादाशी जवळीक साधणारे घटक उकलून दाखविणारा आहे. सदानंद मोरे यांनी मार्क्स आणि आंबेडकर हे वैचारिकदृष्टया कुठे व कितपत जवळ येतात ते आपल्या लेखातून तपासून पाहिले आहे. तात्त्विक दृष्टिकोनांतून तसेच समाजपरिवर्तनपर चळवळींच्या संदर्भात मार्क्सवाद व आंबेडकरवाद यांच्यातील वैचारिक जवळीक तसेच दुरावा हा सध्या महाराष्ट्रात तरी चर्चेचा एक जिवंत विषय आहे. रावसाहेब कसब्यांच्या आंबेडकर आणि मार्क्स या गेल्याच वर्षी प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाने या चर्चेला एक नवे परिमाण मिळवून दिले आहे. शरद पाटील यांनी त्या पुस्तकाचे केलेले परीक्षण व त्या पुस्तकावर नुकत्याच झालेल्या एका चर्चासत्राचा वृत्तांतही आम्ही या अंकात प्रसिद्ध केला आहे. पुस्तकपरीक्षणाच्या

निमित्ताने मार्क्सवाद व आंबेडकरवाद यांच्या विधायक नकारकरणातून नवीन दर्शन उभारण्याची शक्यता व एक दिशा शरद पाटलांनी प्रकट केली आहे.

मार्क्सवादात आढळणारी क्रांतिकारकता व भारतीयांची आध्यात्मिक विचारांची परंपरा यांचे जणू एक समन्वित रूप गांधीजींच्या जीवनात पहावयास मिळते व त्यामुळे गांधीजींचे सर्वोदय हे ध्येय व सत्याग्रह हा मार्ग स्वीकारणारे तत्त्वज्ञान हे मार्क्सवादाचा भारतीय अध्यात्मविचाराबरोबरचा समन्वय म्हणून पुढे मांडता येईल अशी आचार्य जावडेकरांची भूमिका दिसते. त्यांच्या समन्वयवादाचा परिचय करून देऊन मोहन शिगटे यांनी त्याची समीक्षाही केली आहे. श्रीपाद केळकर यांनी आपल्या लेखात राम मनोहर लोहियांच्या मार्क्सवादविषयक मतांचा आढावा घेतला आहे. मार्क्स आणि बुद्ध या विषयावरील दि. मा. खैरकर यांचा लेख व याच विषयावरील तीन पुस्तकांचे परिचयही या अंकात समाविष्ट केले आहेत.

या दोन्ही अंकांमध्ये आमचा दृष्टिकोन 'मार्क्सवादी दृष्टिकोनातून भारतीय विचारवंतांकडेही पाहिले गेले पाहिजे' असा नाही किंवा याउलट 'भारतीय जीवनदृष्टीतून मार्क्सवाद तपासला गेला पाहिजे' असाही नाही. भारतीय विचारवंतांची जीवनदृष्टी व मार्क्सची जीवनदृष्टी यांची तुलना सत्यशोधकी वृत्तीतून व सकस मानवतावाद मांडण्याच्या प्रेरणेतून व्हावी अशी मात्र या विशेषांकाची योजना करताना आमची अपेक्षा होती. मार्क्सवाद व भारतीय विचारवंतांची जीवनदृष्टी या दोन्हींची उचित दखल घेणाऱ्या मानवतावादाची मांडणी या अंकातून शक्य झाली नाही तरी अशा या भिन्न जीवनदृष्टी एकत्र आणताना महत्त्वाचे ठरणारे या विषयाचे काही पैलू ठळकपणे वाचकांच्या नजरेसमोर आणले जावेत एवढा मात्र आमचा किमान हेतू होता व तो या विशेषांकांतून साध्य झाला आहे असे आम्हास वाटते. अर्थात या विशेषांकाच्या दोन्ही भागांत मिळूनही काही त्रुटी अवश्य राहिल्या आहेत याची आम्हाला जाणीव आहे.

प्रदीप गोखले
कार्यकारी संपादक